# मराठी साहित्यविश्वात स्त्रियांचे योगदान

प्रा. डॉ. सविता माधवराव पवार कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर, जि. बुलडाणा. मो. ९०११५७९०७७

---

**प्रस्तावना :**भारतातील प्रमुख भाषांपैकी 'मराठी' ही महत्वाची भाषा म्हणून ओळखली जाते. मराठीचा पहिला उद्‌गार हा लोकसाहित्यातून उमटला. लोकगीते, कृषिगीते, ओव्या, उखाणे, म्हणे व वाक्यप्रचार, लळिते आदिरुपाने मराठी घराघरात होती. परंतु लिखित साहित्याच्या दृष्टीने विचार करता महानुभाव साहित्य आणि वारकरी संतांचे साहित्य या अंगानेच प्रथम विचार करावा लागतो. संस्कृतमधील ज्ञानभांडार सर्वसामान्यांपर्यंत पोचविण्याच्या प्रेरणेतून वारकरी पंथाचे प्रवर्तक संत ज्ञानेश्वर यांनी देशीभाषा मराठीचा वापर करून शके १२१२ मध्ये 'ज्ञानेश्वरी' लिहिली. महानुभाव पंथातही चक्रधरस्वामींनी देशीभाषेचा अंगीकार केला होता. मराठी भाषेच्या मागे एक सामाजिक सांस्कृतिक संदर्भ दिसतो. महानुभाव पंथातील संतकवयित्री महदंबा यांनी कृष्ण रुक्मिणी स्वयंवराचे धवळे अत्यंत सहजपणाने गायले. 'धवळे' हे मराठी साहित्यातील आद्य स्त्री काव्य मानले जाते. ज्ञानदेवांची धाकटी बहीण मुक्ताबाई श्रेष्ठ संतकवयित्री आहे. ताटीचे अभंग, मुक्ताबाई - चांगदेव संवाद आणि काही स्फुट अभंगरचना तिच्या आध्यात्मिक अधिकाराची साक्ष देतात. संत जनाबाई स्वतःकडे नामदेवाचे दास्यत्व घेत 'दळिता कांडिता' अनंताला गात राहिली. "डोईचा पदर आला खांद्यावरी, भरल्या बाजारी जाईन मी," "स्त्रीजन्म म्हणुनि न व्हावे उदास" म्हणणाऱ्या संत जनाबाईंशी आजच्या स्त्रीवादी काळातील स्त्रियांनाही नाते जोडावेसे वाटते. गणिका कुळातील असूनही कान्होपात्रा आपल्या भावबळावर संतपदाला पोचली. श्रेष्ठ भावगीते ठरावीत अशी तिची अभंगरचना आहे. रामदासशिष्या वेणाबाईने 'सीतास्वयंवर' लिहून आख्यानकविता लिहिणारी पहिली स्त्री म्हणून अग्रपुजेचा मान मिळविला. मराठीतील या संतकवयित्रींचे योगदान सर्वश्रुत आहे.

स्वातंत्र्य पूर्वकाळात स्त्रीशिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांची 'काव्य फुले,' त्यांच्या शिष्या मुक्ताबाई साळवे यांचा ' स्त्री दुःखाविषयी निबंध' याची नोंद घ्यावी लागेल. ताराबाई शिंदे यांचे 'स्त्रीपुरुषतुलना' हे पुस्तक आजच्या स्त्रीवादी काळात सर्वतोमुखी आहे. त्याचे महत्व अनन्यसाधारण आहे. कृषिप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रीची भूमिका महत्वपूर्ण राहिलेली आहे. बहिणाबाई चौधरी यांची कविता जानपद गीतांचे सौंदर्य लेऊन सहजपणे ओवी छंदात प्रकटते. जीवनदर्शनाला स्पर्श करण्याचे अलौकिक सामर्थ्य या काव्याला लाभलेले आहे. लक्ष्मीबाई टिळकांनी लिहिलेली कविता सुध्दा स्त्रीमनाचे वेगळे चित्र रंगवणारी आहे. इंदिरा संत, संजीवनी मराठे, पद्मा गोळे यांच्या कवितेला प्रथम सामाजिक आशयाचा स्पर्श झाला. पुनर्विवाह, घटस्फोट, संमतीवयाचा प्रश्न, विवाहाचे वय, अर्भार्जनाचा प्रश्न असे अनेक विषय बदलत्या काळाबरोबर समाजासमोर येत होते. मालतीबाई दांडेकर, शांताबाई नाशिककर, आनंदीबाई किर्लोस्कर आदी नावांचा उल्लेख यासंदर्भात करता येईल, ज्यांनी बदलत्या विश्वाचे भान ठेवून स्त्रियांचे दुःख समाजासमोर मांडले. कादंबरी क्षेत्रातही स्त्रियांचे योगदान महत्वाचे आहे. सामाजिक आशय असणाऱ्या कादंबऱ्या स्त्रियांनी लिहिल्या आहेत. त्याचबरोबर स्त्रीवादी विचारधारेला पूरक अशा कादंबऱ्याही स्त्रियांनी लिहिल्या आहेत. ललित गद्यवाङ्मय प्रकारही स्त्री लेखिकांनी हाताळले आहेत. इरावती कर्वे आणि दुर्गा भागवत यांचे या संदर्भात योगदान महत्वाचे आहे. एकंदरीत कथा, कादंबरी, नाटक, कविता, आत्मचरित्र ललितनिबंध या सर्वच साहित्यप्रकारात लेखन करून स्त्री लेखिकांनी मराठी साहित्याचा प्रांत समृध्द केला आहे. वाङ्मयीन संकेतांविरूध्द आवाज उठवणाऱ्या आणि कथालेखनाचे विविध प्रयोग करणाऱ्या लेखिका म्हणून कुसुमावती देशपांडे यांच्या कथालेखनाचा विचार करावा लागेल त्याचबरोबर स्त्रियांच्या प्रश्नांसंदर्भात बंडखोर लिखाण करणाऱ्या लेखिका म्हणजे विभावरी शिरूरकर त्यांच्या साहित्याचा विचार करावा लागेल.

**विभावरी शिरुरकरांचे परिवर्तनवादी लेखन :** १९३३ मध्ये विभावरींचा 'कळ्यांचे निःश्वास' हा कथासंग्रह प्रसिध्द झाला. त्यांनी निर्भयपणे नावशिक्षित आणि नोकरी करणाऱ्या स्त्रियांची सुखदुःखे, तिचा कोंडमारा, कथेच्या माध्यमाव्दारे समाजासमोर ठेवला. मराठी साहित्यात पूर्वी कधीही न उमटलेला स्त्रीच्या दुःखाचा तीव्र स्वर त्यांच्या कथांमधून उमटला. मराठीत कथेत येणाऱ्या सांकेतिक विषयांना हा सणसणीत छेद होता. सुशिक्षित स्त्रियांचे अनेक प्रश्न त्यांनी मांडले. त्यांच्या कथाबीजांमधून परिवर्तनाची एक दिशा सूचित होत होती. त्यांची 'हिंदोळ्यावर' ही कादंबरी १९३४ मध्ये प्रसिध्द झाली. त्याच वर्षी त्यांची 'विरलेले स्वप्न' ही कादंबरीही प्रसिध्द झाली. 'बळी' १९५० मध्ये प्रसिध्द झाली आणि साऱ्या साहित्याविश्वाचे लक्ष 'विभावरी शिरूरकर' या लेखिकेने वेधून घेतले.

त्यांच्या कादंबऱ्यांतून स्त्रीचा एक माणूस म्हणून विचार व्हायला हवा, अशी स्पष्ट भूमिका दिसते. 'जाई,' 'शबरी,' 'उमा' या कादंबऱ्यातून स्त्रियांचे विविध प्रश्न त्यांनी समाजासमोर भांडले सामाजिक प्रश्नांचे भान त्यांच्या कादंबऱ्यांतून पहायला मिळते.

**ललित गद्य वाङ्मयात इरावती कर्वे यांचे योगदानः** मराठी ललित लेखनात स्वतःचे अढळ स्थान प्राप्त करणाऱ्या लेखिका म्हणजे इरावती कर्वे. त्यांच्या लेखनाला इतिहास, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, लोकसाहित्य यांची बैठक आहे. इरावतीबाईंच्या 'युगान्त' ला प्रथम ललित मासिकाचा पुरस्कार मिळाला मग राज्य सरकारचा पुरस्कार व नंतर साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळावा. त्यांच्या 'परिपूर्ति,' 'भोवरा' आणि 'गंगाजळ' या तीनही संग्रहातील ललितलेख अभ्यासल्यानंतर त्यांच्या समृध्द अनुभवविश्वाचे दर्शन घडते. ललितलेख, स्त्रीविषयक व संस्कृतीविषयक लेख, चिंतनपर, व्यक्तिचित्रे अशा तऱ्हेने सर्व विषयांना स्पर्श करणारे लेखन इरावतीबाईंनी केले आहे. त्यांच्या 'परिपूर्ति' ने ललितनिबंध या नव्या आविष्काराला जन्म दिला. त्यादृष्टीने त्याचे महत्व आहे.

युगान्तमध्ये महाभारताच्या कलात्मक आणि सामाजिक अशा दोन्ही अंगांचा इरावतीबाईंनी विचार केलेला आहे. महाभारतातील महत्वपूर्ण व्यक्तिरेखांचा वेध त्यांनी युगान्तमध्ये घेतला आहे. या व्यक्तिरेखांचा शोध घेताना त्यांची चिकित्सकवृत्ती जाणवत राहते. युगान्त वाचत असताना त्यातील लालित्याबरोबरच लेखिकेची मानसशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय भूमिका आपल्याला जाणवते.

**दुर्गाबाई भागवत यांचे साहित्य:** इरावती कर्वे यांच्या प्रमाणेच दुर्गाबाईंची साहित्यविषयक उत्तुंगता आहे. दुर्गा भागवत यांनी ललितगद्य विषयक विपुल लेखन केले आहे. ऋतुचक्र, भावमुद्रा, व्यासपर्व, रुपरंग, पैस, डूब, प्रासंगिका, लहानी, आठवले तसे आणि दुपानी इ. त्यांच्या लेखसंग्रहातून जवळजवळ २२५ ते २५० ललितलेख, व्यक्तिचित्रे आहेत. त्यांच्या सहित्यातून त्यांचे कलासक्त मन सौंदर्याचा वेध घेताना दिसते. त्यांच्या लेखनातून त्यांची सौंदर्यप्रतीती जाणवत राहते. त्यांच्या लेखनात विविध संदर्भ सहजतेने येतात. 'व्यासपर्व' हे दुर्गा भागवतांचे महत्वाचे वैचारीक गद्यलेखन आहे. व्यासांच्या महाभारत या महाकाव्याचा, त्यातील व्यक्तिरेखांचा त्यांच्या भावभावनांचा वेध त्यांनी 'व्यासपर्व' मध्ये घेतला आहे. महाभारताचा त्यांनी कलात्मक अंगाने विचार केला आहे.

**इंदिरा संतांची कविता:** काव्याच्या प्रांतात विशेषतः भावकवितेच्या क्षेत्रात इंदिरा संत यांचे नाव महत्वपूर्ण आहे. 'शेला,' 'मेंदी,' 'रंगबावरी,' 'मृगजळ,' 'बाहुल्या,' 'गर्भरेशीम,' आदी त्यांच्या काव्यसंग्रहाव्दारे त्यांची काव्यप्रतिभा लक्षात येते. पतीनिधनानंतर विरहाची वेदना त्यांच्या काव्याला व्यापून उरते; त्याच्या कवितेसाठी तीच एक कलात्मक बळ ठरते. आपल्या वेदनेचा आविष्कार इंदिरा संत निसर्गप्रतिमांच्या साह्याने अर्थपूर्ण बनवितात त्यांच्या 'गर्भरेशीम' या काव्यसंग्रहाला १९८८ मध्ये साहित्य अकादमीचा पुरस्कार सुध्दा मिळाला. पतीनिधनानंतरचे एकाकीपणाचे दुःख, त्यांची लयबध्द भाषा, त्यांच्या अनुभूतीतून प्रकटणारी शब्दकळा, त्यांच्या काव्यातील निसर्गप्रेम यामुळे त्यांचे काव्य जिवंत झाले आहे. मराठी काव्याच्या प्रांतात बहिणाबाई चौधरी, संजीवनी, पद्मा गोळे, इंदिरा संत, शांता शेळके, शिरीष पै, अनुराधा पोतदार, प्रभा गणोरकर, सुहासिनी इर्लेकर, अनुराधा पाटील, प्रतिमा इंगोले, आसावरी काकडे, सुलभा हेर्लेकर, प्रज्ञा लोखंडे, मलिका अमर शेख, नीरजा आदी कवयित्रींनी नवीन जाणिवेच्या कविता लिहून मराठी काव्याचा प्रांत समृध्द केला आहे.

**बहिणाबाईंची कविता :** १९५० च्या सुमारास बहिणाबाई चौधरी यांचा 'बहिणाबाईची गाणी' हा संग्रह प्रकाशित झाला. त्यांचे विविध जीवनानुभव काव्यरुप घेऊन प्रकटलेले दिसतात. त्यांच्या संवेदनशील मनाचा प्रत्यय आपल्याला त्यांच्या काव्यातून येतो. बहिणाबाई या अभिजात प्रतिभावंत असल्यानेच त्यांना आपल्या काव्यनिर्मितीक्षमतेची जाणीव होती. बहिणाबाईंची चिंतनशीलता त्यांच्या काव्यातून ठायी ठायी प्रकटते. त्यांचे मन आजुबाजुच्या घटना प्रसंगाचे, वृत्तीप्रवृत्तींचे, जीवनव्यवहाराचे सतत निरीक्षण करताना दिसते आणि हे निरीक्षण, अनुभव काव्यरूप घेऊन येताना दिसतात. त्या आपल्या काव्यातून जीवनविषयक तत्वज्ञान मांडताना दिसतात. जीवनसत्याविषयी त्यांची कविता बोलत राहते त्यामुळेच मराठी माणसाला ती कविता आपली आणि म्हणून जिव्हाळ्याची वाटते. बहिणबाईंनी अतिशय आत्मविश्वासाने आणि अधिकारवाणीने कविता लिहलेली दिसते. कष्टाला प्रमाण मानणारी त्यांची कविता नशिब वा दैववादी वृत्ती खोडून काढते. बहिणाबाईंचे एक अनुभवविश्व आहे. त्या अनुभवविश्वाची म्हणून जी भाषा आहे ती त्यांना पूर्णतः परिचित आहे, तिच्यावर त्यांचे प्रभुत्व आहे. त्यामुळेच त्यांनी कविता सहजतेने अर्थाभिव्यक्ती साधते.

मराठीमध्ये स्त्रियांनी आत्मचरित्राचेही दालन समृध्द केलेले आहे 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' हे १९१० मध्ये रमाबाई रानडे यांनी लिहिलेले आत्मचरित्र हे स्त्रीरचित पहिले आत्मचरित्र म्हणता येईल. आनंदीबाई कर्वे यांचे 'माझे पुराण,' लक्ष्मीबाई टिळकांचे 'स्मृतिचित्रे' गोदावरी परुळेकरांचे 'जेव्हा माणूस जागा होतो' माधवी देसाई यांचे 'नाच ग घुमा,' मलिका अमरशेख यांचे 'मला उद्ध्वस्त व्हायचंय' आदी आत्मचरित्रातून सामाजिक जीवनाच्या खुणा उमटलेल्या दिसतात. ही आत्मचरित्रे म्हणजे स्त्रियांच्या स्थितीगतीचे चित्र रेखाटणारे महत्वाचे दस्तऐवज म्हणता येतील.

**लक्ष्मीबाई टिळकांचे 'स्मृतिचित्रे':** मराठीतील एक वैशिष्ट्यपूर्ण आत्मचरित्र म्हणून लक्ष्मीबाई टिळक यांच्या 'स्मृतिचित्रे' चा उल्लेख करता येईल. हे आत्मचरित्र प्रकाशित होऊन एवढा काळ लोटला तरी त्याचे महत्व आजही अबाधित आहे. या आत्मचरित्राचा पट लक्ष्मीबाईंच्या बालवयापासून ते जवळपास १९२४ सालापर्यंतचा आहे. या आत्मचरित्रात लक्ष्मीबाईंनी त्यांच्या जीवनाचे जे दर्शन घडविले आहे ते कोठेही कंटाळवाणे होत नाही. त्यांच्या निरीक्षणशक्तीला मार्मिकतेची जोड आहे. लक्ष्मीबाईंना देखील त्यांच्या आयुष्यात भल्याबुऱ्या व्यक्तींचा अनुभव आलेला आहे आणि या व्यक्तींमधील चांगल्या वाईटाचे दर्शनही त्यांनी घडविले आहे. परंतु हे करताना त्यांचा हेतू त्यांच्याविषयी वाचकांच्या मनात अनुकुल वा प्रतिकूल ग्रह निर्माण करण्याचा दिसत नाही. स्वच्छ मनाने, तटस्थ वृत्तीने अनेक घटनाप्रसंग आणि त्यातून अनेक तऱ्हांच्या माणसांचे त्यांनी दर्शन घडविले आहे. लक्ष्मीबाईंच्या ओघवत्या निवेदनशैलीने 'स्मृतिचित्रे' वाचकांच्या स्मरणात कायम वसतीला राहणारे झाले आहे.

**स्त्रियांचे कादंबरी लेखनः** स्त्री लेखिकांच्या कादंबरीलेखनाचा विचार करताना साळूबाई तांबवेकरांच्या 'चंद्रप्रभाविरह वर्णन' (१८७३) या कादंबरीचे नाव घ्यावे लागते. काशिताई कानिटकर यांच्या 'रंगराव' आणि 'पालखीचा गोंडा' या कादंबऱ्या प्रसिध्द आहेत. कमलाबाई सोहनी, कमलाबाई बंबवाले यांनीही कादंबरी लेखन केले आहे. विभावरी शिरूरकर यांच्या 'हिंदोळ्यावर,' आणि 'विरलेले स्वप्न' या कादंबऱ्या महत्वपूर्ण आहेत. आशा बगे यांची 'सेतू' ही एक अंतर्मुख करणारी कादंबरी आहे. 'भूमी' ही सुध्दा त्यांची लक्षणीय कादंबरी आहे. या कादंबरीसाठी त्यांना २००६ चा साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. शांता गोखले यांची 'रीटा वेलिणकर' ही कादंबरीही उल्लेखनीय आहे. शिवाय मेघना पेठे, जाई निंबकर, अंबिका सरकार ही नावेही लक्षणीय आहेत.

**गौरी देशपांडे यांचे कादंबरीलेखन :** कादंबरीच्या क्षेत्रात गौरी देशपांडे यांचे नाव महत्वाचे आहे. 'एकेक पान गळावया,' 'मध्य लटपटीत' यामधून त्यांनी नवयुगातील स्त्रियांच्या समस्यांचा वेध घेतला आहे. त्यांच्या कादंबऱ्यांतील नायिका लग्नसंस्था नाकारत नाहीत पण त्यातून निर्माण होणारे जाच आणि कोंडी यांचा मात्र विचार करतात. ही कोंडी त्यांना नको असते. मनासारखं स्वतंत्र आयुष्य त्या जगू पाहतात. गौरी देशपांडे यांच्या नायिका व्यक्ती म्हणून जगण्याची धडपड करताना दिसतात. त्यांच्या कथा कादंबऱ्यांतील स्त्रिया विवाहितच असतात परंतु त्या आंधळेपणाने आयुष्य स्वीकारत नाहीत. समाज आपल्यावर पारंपरिक जगण लादत असला तरी आपण मात्र ते नाकारायला हवे असे या स्त्रिया सुचवतात. गौरी देशपांडे यांच्या कथाकादंबऱ्यांत स्त्रीपुरुष संबंधाचा, एकूणच मानवी नातेसंबंधाचा शोध केंद्रस्थानी असतो.

**सानिया यांचे कादंबरीलेखन:** आजची स्त्री नवजाणीवा घेऊन वावरत आहे तिच्या अनुभवाच्या कथा रुंदावत आहेत. नोकरी , शिक्षण वा अन्यक्षेत्रातील वावरामुळे स्त्री ही समाजात पुरुषांच्या बरोबरीने वावरत आहे. सानिया यांच्या कादंबऱ्यांतून आधुनिक तशीच समंजस स्त्री भेटते. ही स्त्री पुरुषाच्या विरुध्द नाही किंवा अगदी टोकाची भूमिका घेताना दिसत नाही. परंतु तिला स्वतःच्या विकासाचा ध्यास आहे. स्वतःच्या घडत जाण्याला त्यांच्या 'स्थलांतर,' 'आवर्तन' आणि 'अवकाश' मधील नायिका महत्व देताना दिसतात. या नायिका स्वतःमध्ये आपल्याला हवा तसा बदल घडवून आणण्यात यशस्वी होतात. या कादंबऱ्यांमध्ये स्त्रियांनी स्वतःचा घेतलेला शोध आणि हळूहळू त्यांचे सिध्द होत जाणे महत्वपूर्ण आहे.

**स्त्रियांचे नाट्यलेखन :**मराठी नाटकाच्या प्रारंभीच्या काळात पुरुषांच्या प्रोत्साहनातून आणि प्रेरणेतूनच स्त्रियांनी नाटके लिहिलेली दिसतात. हिराबाई पेडणेकर, सोनाबाई केरकर, काशीबाई फडके यांनी प्रारंभीच्या काळात सामाजिक, ऐतिहासिक आणि पौराणिक नाटके लिहिली. गिरिजाबाई केळकर यांची पाच नाटके आहेत. मालतीबाई बेडेकर यांच्या 'पारध' या नाटकात परित्यक्त स्त्रीला कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे वर्णन केले आहे. पद्मा गोळे यांच्या 'नवी जाणीव' या नाटकात स्त्रीला काळानुरुप बदलणे कसे महत्वाचे आहे त्याचदृष्टीने विचार आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये मालतीबाई दांडेकर, तारा वनारसे, कुमुदिनी रांगणेकर, जोत्स्ना देवधर, शिरीष पै, सई परांजपे यांची काही लक्षणीय नाटके आहेत.

**सई परांजपे यांचे नाट्यलेखन:** मराठी नाटकाच्या प्रांतात महत्वाची नाममुद्रा उमटली आहे ती सई परांजपे यांची. लेखिका, दिग्दर्शक आणि निर्माती म्हणूनही यांचे योगदान मोठे आहे. त्यांची 'नांदा सौख्यभरे,' 'इडा पिडा टळो,' 'जास्वंदी,' 'माझा खेळ मांडू दे,' 'सख्खे शेजारी' इ. नाटके महत्वपूर्ण आहेत. त्यांच्या 'जास्वंदी ' नाटकाचा विषय कल्पनारम्य आहे. दोन मांजरांच्या नजरेतून मानवी स्वभावाचे अवलोकन त्यांनी या नाटकात केले आहे. माणसे माणसांना ओळखत नाहीत, पण मांजरे मात्र माणसांना ओळखून असतात, हे सूत्र या नाटकातून लेखिकेने मांडल्याचे दिसते. 'माझा खेळ मांडू दे' या नाटकातील मामी, रिबेका आणि पदमिनी यांच्या समस्या वेगवेगळया आहेत. परंतु त्या समस्यांचे त्यांनी यशस्वीपणे चित्रण केले आहे. त्यांची नाटके कलात्मकतेने साकारली आहेत.

**स्त्रियांचे कथासाहित्य :** कुसुमावती देशपांडे, विभावरी शिरूरकर, गीता साने, जोत्स्ना देवधर, विजया राजाध्यक्ष, आशा बगे, प्रतिभा रानडे, अनुराधा वैद्य, सिसिलिया कार्व्हालो यांनी मराठी कथाविश्व समृध्द केले. कमल देसाई यांनी मराठीमध्ये अस्तित्ववादी कथा लिहिल्या. 'काळा सूर्य आणि हॅट घालणारी बाई', 'रंग' हे त्यांचे कथासंग्रह आहेत. गौरी देशपांडे, प्रिया तेंडुलकर या लेखिकांनीही अस्तित्ववादी कथा लिहिलेल्या दिसतात. स्त्रीवादी भूमिकेतूनही मराठीमध्ये कथासाहित्य लिहिले गेले. गौरी देशपांडे, सानिया, प्रिया तेंडुलकर, छाया दातार, मेघना पेठे, उर्मिला पवार, अंबिका सरकार, प्रतिभा रानडे आदी लेखिकांनी स्त्रीवादी विचारसरणीला स्पर्श करणाऱ्या कथा लिहिल्या.

**समारोप :**गेल्या दीडशे वर्षांच्या काळात स्त्रियांनी वाङ्मयाच्या सर्वच क्षेत्रामध्ये त्यांची नोंद घ्यावी असे लेखन केले आहे. कथा, कविता, कादंबरी, ललितगद्य, आत्मचरित्र, वैचारिक लेखन. समीक्षा लेखन या सर्वच क्षेत्रात त्यांची कामगिरी महत्वपूर्ण आहे. स्त्री लेखिकांनी आपल्या प्रतिभेच्या बळावर मराठी साहित्यप्रवाहावर आपली मुद्रा उमटविली आहे. विभावरी शिरूरकर, कुसुमावती देशपांडे, इंदिरा संत, बहिणाबाई, दुर्गा भागवत, इरावती कर्वे, कमल देसाई, गौरी देशपांडे, आशा बगे, सानिया यांनी आपापल्या क्षेत्रात साहित्य निर्मिती करून मराठी साहित्याला समृध्द केले आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. महर्षी ते गौरी - मंगला आठलेकर
२. मराठीतील आत्मचरित्रपर लेखन - उषा हस्तक
३. भारतीय भाषांतील स्त्रीसाहित्याचा मागोवा (इ.स.१८५० ते २०००) खंड २ - संपादक - डॉ. खांडगे, डॉ. गुंडी, डॉ. देवधर, डॉ. मिरजकर
४. स्त्री नाटककारांची नाटके - डॉ. मथुरा कोरान्ने
५. अर्वाचीन मराठी कवयित्री - डॉ. अलका चिडगोपकर